# पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर,वसई-विरार

सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७

Phone No.022-29451003,

Email ID- cpoffice.mbvv@mahapolice.gov.in


जा.क्र.पोआ/मिभाववि/आस्था-1/001-25/चा.कौ.चा.पा.यादी// 78 /2026 दिनांक :- 01.04.2026

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार चालक पोलीस शिपाई भरती सन 2024-25 चालक पोलीस शिपाई पदाचे कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालयाच्या आस्थापनेवरिल सन 2024-25 करीता रिक्त असलेल्या 81 चालक पोलीस शिपाई पदाची शारिरीक चाचणी व मैदानी चाचणी दि. 11.03.2026 ते दि. 25.03.2026 रोजी पर्यंत आयोजित करण्यात आलेली होती. सदर शारिरीक चाचणी व मैदाणी चाचणी पुर्ण झालेली आहे.

शारिरीक व मैदानी चाचणीकरीता हजर असलेल्या उमेदवारांपैकी जे उमेदवार शारिरीक मोजमापात पात्र ठरले आहेत अशा उमेदवारांचे मैदाणी चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांची चेस्ट क्रमांकानुसार एकत्रित तात्पुरती यादी या कार्यालयाचे https://mbvv.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर दि. 28.03.2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांच्या कार्यालयाकडील दि. 19.01.2026 रोजी निर्गमीत करण्यात आलेली पोलीस शिपाई आणि चालक पोलीस शिपाई आदी पदाची भरती प्रक्रिया कार्यपध्दती व तद्अनुषंगाने दि. 02.03.2026 रोजी केलेल्या सुधारणेनुसार मैदानी चाचणीत किमान 50% व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांपैकी प्रवर्ग निहाय गुणवत्तेनुसार पदांच्या 1:15 या प्रमाणात कौशल्य चाचणीसाठी पात्र उमेदवारांची यादी कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहून तयार करण्यात आलेली आहे. सदर यादी यासोबत संलग्न करुन या कार्यालयाच्या https://mbvv.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. या प्रवर्गनिहाय यादीप्रमाणे एकुण 2081 एवढे उमेदवार कौशल्य चाचणीसाठी पात्र झालेले आहेत. सदरची प्रवर्गनिहाय यादी यासोबत जोडली आहे.

चालक पोलीस शिपाई कौशल्य चाचणीकरीता पात्र उमेदवार यादीबाबत काही हरकती असल्यास त्या संदर्भात आपले लेखी निवेदन/अर्ज दिनांक - 03.04.2026 रोजी 14.00 वाजे पावेतो या कार्यालयाच्या ईमेल आयडी sheetbranch1.mb-vv@mahapolice.gov.in वर सादर करावेत. तद्नंतर प्राप्त होणा-या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

दिनांक- 01/04/2026

ठिकाणी :- मिरा-भाईंदर, वसई-विरार

01/04/26

(दत्तात्रय शिंदे)

अपर पोलीस आयुक्त,

मिरा-भाईंदर, वसई-विरार

CamScanner